REGISTERED No. B. 3434

**अर्थ**

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार,
इत्यादि विषयांस वाहिलेलें साप्ताहिक.

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.

*वर्गणीचे दर :*

वार्षिक : ६ रु. सहामाही : ३ रु.

किरकोळ अंक : २ आ.

*जाहिरातीचे दर :*

करारांच्या व इतर अटी जाहिरातखात्याकडून मागवाव्यात.
चेक, मनिऑर्डरी, इ. पाठविण्याचा पत्ताः–

"अर्थ"
"दुर्गाधिवास" पुणें ४.

# अर्थ

*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूली धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र*

वर्ष १६ — पुणें, बुधवार तारीख ३ मे, १९५० — अंक १८

## भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

**मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.**

**शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.**

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ६९,६०० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. दृ. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलुएल्. बी. — श्री. बा. ग. धंडुके.

**बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.**

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी

लवकरच पुणें कचेरीचें ऑफिस ३६१–६२, बुधवार पेठ, येथें जाणार आहे.

पुणें कचेरी ५१५ बुधवार — अधिक माहितीसाठी लिहा. रा. गो. आगाशे, बी. ए. (ऑ.) मॅनेजर.

## दि सांगली स्टेट सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली

( स्थापना सन १९२७ )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ५,००,००० रु. |
| खपलेलें भांडवल | १,९३,५०० रु. |
| भरलेलें भांडवल | १,१४,२३० रु. |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,१७,५४३ रु. |
| खेळतें भांडवल | १५,५१,०८८ रु. |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग व करंट ठेवी स्वीकारल्या जातात. बँकेचे सभासदांना, सोसायट्यांना व व्यक्तिशः भागीदारांना योग्य तारणावर कर्जें दिलीं जातात. सोन्याचे तारणावर सवलतीचे व्याजाचे दरानें कर्ज दिलें जातें. वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा व इंडिया इक्विटेबल. इं. कं. लि. कलकत्ता, या कंपन्यांचे विम्यांचे हप्ते स्वीकारले जातात. चेक–हुंड्यांची खरेदी-विक्री, सरकारी कर्जरोखे व शेअर्स यांची खरेदी-विक्री व व्याज-वसुली वगैरे

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.**

ना. पां. ठाणेदार, मॅनेजर — भ. अं. दप्तरदार, बी. ए. चेअरमन.

## दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.

( शिड्यूल्ड बँक )

**प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग**

पुणें २.

| | |
|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. १०,००,०० |
| जमा झालेलें भांडवल | रु. ७,१६,८१५ |
| खेळतें भांडवल | रु. ७१,००,००० |

मुंबई शाखाः—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. — श्री. द्वा. ग. बापट, उपाध्यक्ष.

**बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.**

श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर. — श्री. सी. टी. चितळे, मॅनेजिंग डायरेक्टर.

पांच हॉर्स पावरचें
डिझेल एंजीन
घ्यावयाचें म्हणजे तें किर्लोस्कर पीटरच! संपूर्ण पंपिंग सेटही मिळेल. चौकशी करा.
केळकर बंधू, बुधवार चौक, पुणें शहर.

## विविध माहिती

**नारळांसाठी संशोधनकेंद्र**—नारळाच्या झाडांची लागवड अधिक सुधारलेल्या पद्धतीनें व्हावी म्हणून प्रयोग करण्यासाठी रत्नागिरी येथें एक संशोधन केंद्र स्थापन करण्यांत येणार आहे. इंडिअन सेंट्रल कोकोनट कमिटीनें ह्या योजनेला मान्यता दिली असून कमिटी योजनेचा निम्मा खर्च सोसणार आहे. पांच वर्षांच्या ह्या योजनेला एकूण १,६०,००० रुपये खर्च येणार आहे. नारळाच्या लागवडीला कोणतें खत चांगलें ह्याबद्दलही संशोधन करण्यांत येणार आहे. मुंबई सरकार योजनेचा निम्मा खर्च करणार आहे. योजना यशस्वी झाल्यास मुंबई राज्य १० ते १५ वर्षांत नारळापुरतें स्वयंपूर्ण होईल असा अंदाज आहे.

**हिंदी चहाची ब्रिटनकडून खरेदी**—ब्रिटन भारताकडून २७·५ कोटी पौंड चहा खरेदी करण्याचा करार करणार आहे असें समजतें. १९५० सालांत चहा खरेदी करण्याच्या करारासाठी बोलणीं सुरू झालीं, त्यावेळेपेक्षां दर पौंडामागें १ पेन्स अधिक किंमत देण्यास ब्रिटन तयार आहे. गेल्या वर्षीपेक्षा ही किंमत पौंडामागें ४ पेन्सनीं अधिक आहे.

**सिगारेटच्या निर्यातीवरील कर रद्द**—सिगारेटच्या निर्यातीला उत्तेजन देण्यासाठी भारत सरकारनें नोव्हेंबर १९४९ मध्यें सिगारेटच्या किंमतीवरील १५ टक्के निर्यातकर ७॥ टक्के केला होता. आतां सर्व प्रकारच्या सिगारेटवरील निर्यात कर आजिबात रद्द करण्यांत आला आहे. तथापि ह्या सवलतीचा काय फायदा घेण्यांत येतो इकडे सरकार लक्ष ठेवणार आहे.

**अफगाणिस्थानमधील भूमिगत तेल**—अफगाणिस्थानचें सरकार देशांतील पेट्रोल उपसण्याच्या सवलती कोणत्याही राष्ट्राला द्यावयास तयार नाहीं. अशा सहाय्यापेक्षा संयुक्त-राष्ट्र-संघटनेमार्फत आर्थिक मदत मिळवणें त्या सरकारला अधिक पसंत आहे. देशांतील पेट्रोल उपसण्याचा धंदा उभारण्यासाठी अफगाणिस्थान इंटर नॅशनल बॅंकेकडे कर्जाची मागणी करणार आहे, असें समजतें.

**मद्यासाठी परवाने**—मद्रास राज्यांत भारतीय नागरिक सोडून इतरांना वार्षिक ५० रुपये फी घेऊन मद्यासाठी परवाने देण्यांत येतात. वरील फी ऐवजीं ५०० रुपये फी घेऊन नागरिकांना मद्याचे परवाने देण्याचा विचार मद्रास सरकार करीत होतें. परंतु आतां ह्याबाबत फेरविचार न करण्याचें मद्रास सरकारनें ठरविलें आहे.

**गुजरातमधील सहकारी चळवळ**—बॉबे प्रॉव्हि. को-ऑ. इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष श्री. जे. ए. मदन ह्यांचे अध्यक्षतेखालीं सहकारी चळवळीविषयीं आस्था असणाऱ्यांची एक सभा अहमदाबाद येथें भरली होती. उत्तर गुजरातमध्यें सहकारी चळवळ प्रगत करण्याची पहिली पायरी म्हणून अहमदाबादला सहकारी शिक्षणाची एक शाळा काढण्याचें सभेंत ठरलें. सध्या अशी एक शाळा सुरत येथें आहे आणि वढोयाला लवकरच निघणार आहे.

**आमचे ओझें तुम्हीं उचला**—ब्रिटिश साम्राज्यांतील हिंदुस्थान, इजिप्त व इतर कांहीं देश युद्धकालांत ब्रिटनचे धनको झाले आहेत. ह्या राष्ट्रांना द्यावयाच्या पौंडी गंगाजळीपैकीं कांहीं भाग अमेरिकन सरकारनें डॉलरच्या रूपानें द्यावा असें ब्रिटनतर्फे सुचविण्यांत आलें आहे. ब्रिटनला सुमारें ९०० कोटी पौंड देणें द्यावयाचें आहे. त्यापैकीं कांहीं डॉलरच्या रूपानें फेडण्यांत आल्यास ब्रिटनच्या औद्योगिक परिस्थितींत सुधारणा होईल आणि आशियामधील कम्युनिझमच्या प्रसाराला आळा बसविण्यास मदत होईल अशी अपेक्षा करण्यांत येत आहे.

**फुकट्या प्रवाशांमुळें नुकसान**—फुकट्या प्रवाशांमुळें रेल्वेचे किती नुकसान होतें तें भारताच्या रेल्वे खात्यातर्फे प्रसिद्ध करण्यांत आलें आहे. १९४८–४९ सालीं ६० लाख फुकट्या प्रवाशांना पकडण्यांत आलें आणि त्यांच्यापासून १,१५,००,००० रुपये वसूल करण्यांत आले. त्याशिवाय लगेजबद्दल ज्यादा आकार न दिलेल्या सामानाबद्दल २३ लाख रुपये वसूल करण्यांत आले. १९४९–५० सालीं दर महिना सरासरी १३ लाख रुपये फुकट्या प्रवाशांकडून वसूल करण्यांत आले.

**विजेच्या पुरवठ्यांत कपात**—पापनाशम् विजेच्या केंद्रांतून होणाऱ्या विजेच्या पुरवठ्यांत कांहीं दिवसांपूर्वी २५ टक्के कपात करण्यांत आली होती. पायकारा, पापनाशम् व मेटूर ह्या तलावांतून पाण्याचा सांठा कमी झाल्यामुळें कारखान्यांना व घरांना पुरविल्या जाणाऱ्या विजेंत आणखी १५ टक्के कपात करण्यांत आली आहे.

**फाळणी व हिंदी विमा व्यवसाय**—भारताची फाळणी झाल्यापासून हिंदी विमा कंपन्यांच्या पाकिस्तानांतील धंद्यांत फार अडचणी उत्पन्न झाल्या आहेत. आपल्या विमेदारांचे हप्ते पाकिस्तानांत गोळा करून ते त्याच देशांतील बॅंकांत अनामत खातीं ठेवावे लागतात; विमेदारांच्या हप्त्यापोटीं जमा करतां येत नाहींत. ह्या रकमेवर विमाकंपन्यांना व्याजही मिळत नाहीं. हिंदी विमा कंपन्यांचे पाकिस्तानांत २ लाखांवर विमेदार आहेत. त्यांच्या विम्यांची दर्शनी किंमत ६० कोटी रुपये आहे आणि विम्याच्या हप्त्यांचें वार्षिक उत्पन्न १५० लाख रुपये आहे.

**वेतनाच्या समानतेला ब्रिटनचा विरोध**—ब्रिटनच्या सध्याच्या परिस्थितींत, सारख्या दर्जाच्या कामासाठी स्त्रियांना व पुरुषांना एकच वेतन देण्यांत यावें ह्या ठरावाला ब्रिटनला मान्यता देतां येत नाहीं असें आंतरराष्ट्रीय मजूर कचेरीला ब्रिटिश सरकारनें कळविलें आहे. भारतानें आणि इतर कांहीं देशांनीं इतक्या काटेकोर ठरावाऐवजीं दुसऱ्या किंचित कमी बंधनकारक ठरावाला मान्यता देण्याचें कबूल केलें आहे.

—सर्व प्रांतांतील—
सुती–गरम–रेशमी
—खादीचें माहेरघर—
खादी मन्दिर
२६२, बुधवार पेठ
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २.

# अर्थ

बुधवार, ता. ३ मे, १९५०





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## गेल्या अडीच वर्षांतील बँकिंगचा आढावा

भारताचे अर्थमंत्री, डॉ. जॉन मथाई, ह्यांनीं गेल्या आठवड्यांत मुंबई येथें बँक ऑफ इंडिया लि. च्या प्रचंड आठ मजली इमारतीचें उद्घाटन केलें. त्यावेळीं त्यांनीं ऑगस्ट १९४७ नंतरच्या काळांतील हिंदी बँकिंगचा आढावा घेऊन, प्रमुख जॉइंट स्टॉक बँकांनीं आपली काळजीकाटय्याची आणि पद्धतशीर कारभाराची परंपरा टिकविल्याबद्दल प्रशंसोद्गार काढले. हिंदुस्थानच्या फाळणीमुळें अनेक अडचणी निर्माण झाल्या तरी बँकांकडील ठेवींत वाढ होत गेली. पुढें कांहीं महिने ठेवी घटत चालल्या तरी त्या आतां एका पातळीवर टिकून आहेत. युद्धकाळांत बँकांकडील चालू खात्यांवरील ठेवी पुष्कळच वाढल्या होत्या आणि त्या खात्यांतील ठेवीच आतां घटल्या आहेत. ह्या घटीस अर्थमंत्र्यांनीं पांच कारणें सांगितलीः-(१) युद्धकालीन नियंत्रणांतून व्यापार व उद्योगधंदे ह्यांची मुक्तता होत गेली, तसतसे ते त्यांच्या वाढीसाठीं बँकांतील ठेवींचा उपयोग करूं लागले. (२) युद्धाचा परिणाम म्हणून, बचत करण्याची शक्ती पूर्वी मुख्यतः वरच्या व मध्यम वर्गांत होती ती नाहींशी होऊन, त्याच्या खालच्या पातळीच्या वर्गाकडे ती शक्ती आली आहे. हा वर्ग आपली बचत शेअर्स किंवा बँकेच्या ठेवी ह्यांत गुंतवीत नाहीं. (३) राजकीय स्थित्यंतरांचाहि ठेवींवर परिणाम झाला आहे. हल्लींच्या पाकिस्तानांतील पूर्वीचे हिंदी रहिवासी आतां भारतांत आले आहेत, ते पूर्वीच्या बचतीवरच आज जगत आहेत. कांहीं परदेशी भांडवल त्याच्या देशांत परत गेलें आहे. पूर्वीच्या संस्थानांची गुंतवणूक विकण्यांत येऊन, नव्या बचतीस आळा बसला आहे. (४) बँकांनीं दिलेल्या कर्जांत वाढ झाली आहे. सुमारें ५०% ठेवी कर्जांत गुंतविल्या गेल्या आहेत. (५) कांहीं बँकांनीं पैसे देण्याचें थांबविलें आणि कांहीं बँकांबाबत कंड्या पिकवल्या गेल्या. त्यामुळें ठेवीदारांत घबराट उत्पन्न होऊन कांहीं बँकांतून फार मोठाल्या रकमा काढल्या गेल्या.

कित्येक बँका बंद पडल्या तरी रिझर्व्ह बँकेच्या सहाय्यामुळें व उपाययोजनेमुळें पश्चिम बंगाल व इतर कांहीं ठिकाणें येथील आपत्ति टळूं शकली आहे. नवा बँकिंग कायदा प्रारंभीं जाचक वाटला तरी तो हितकारक ठरत आहे. बँकांच्या वेळोवेळ तपासणीची तरतूद आतां झाली असल्यामुळें त्यांच्या कारभारांत पुष्कळच सुधारणा आपोआपच होऊं शकेल. रिझर्व्ह बँकेचें हिंदी बँकिंगबाबत धोरण अत्यंत सहानुभूतीचें व उदारपणाचें आहे, तें इतकें कीं कांहीं बाबतींत रिझर्व्ह बँक त्यासाठीं रोषास पात्र झाली आहे. अशा परिस्थितींत, डॉ. मथाई ह्यांनीं बँकांच्या सहकार्याची मागणी केली, ती विशेष अर्थपूर्ण आहे. कठीण आर्थिक परिस्थितींत सरकारला प्रमुख हिंदी बँकांनीं महत्त्वाचें सहाय्य केलें, ह्याबद्दल डॉ. मथाई ह्यांनीं प्रकट समाधान व्यक्त केलें आहे.

## फाउण्टन पेनच्या शाईच्या धंद्याबाबत टॅरीफ बोर्डाकडून चौकशी

"या देशांत फाउण्टन पेनच्या शाईच्या धंद्यास मुख्यतः युद्धकाळांत सुरवात झाली असून युद्धकाळांत आणि युद्धोत्तर काळांत या वस्तूच्या परदेशांतून होणाऱ्या आयातींत मोठ्या प्रमाणावर घट झाल्यामुळें त्याची इथें मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे." असें इंडिअन टॅरिफ बोर्डाचे एक सभासद डॉ. एच. एल. डे यांनीं इंडियन टॅरिफ बोर्डाच्या कचेरींत फाउण्टन पेनच्या शाईच्या धंद्यास संरक्षण देण्याबाबतच्या जाहीर चौकशीस सुरवात करतांना सांगितलें. याप्रसंगीं बोर्डाचे दुसरे एक सदस्य, डॉ. बी. व्ही. नारायणस्वामी नायडू हे उपस्थित असून त्यांनींहि या चर्चेंत भाग घेतला.

फाउण्टन पेनच्या शाईच्या धंद्यास लहान प्रमाणावर व सर्वसाधारणपणें घरगुती धंद्याच्या स्वरूपांत सुरवात झाली असल्याचें डॉ. डे यांनीं सांगितलें. हा धंदा मुख्यतः तौलनिक दृष्ट्या कमी उत्पन्न असलेल्या सुशिक्षित मध्यमवर्गीय लोकांनीं सुरू केला. या धंद्यांत निरनिराळ्या संस्थांनीं २५० रु. ते २ लाख रुपयांपर्यंत भांडवल घातलें. परंतु बहुतेक प्रसंगीं तें २० हजार रुपयांपेक्षां कमीच होतें. देशी शाईचा दर्जा ठरवितांना परदेशांतील उत्कृष्ट दर्जाच्या शाईबरोबर तिची तुलना न करितां, सारख्याच दर्जाच्या देशी प्रकारांची एकमेकांशीं तुलना करून सर्वांत लोकप्रिय व प्रातिनिधिक दर्जाची शाई परदेशांतून आयात केलेल्या त्याच दर्जाच्या शाईपेक्षां अधिक चांगली आहे वा नाहीं तें पहाणेंच इष्ट होय. दोन औंस आकाराच्या १,२०,००० ग्रोस बाटल्यांची प्रतिवर्षी मागणी आहे. दोन औंस आकाराच्या ५०० ते ६०० ग्रोस बाटल्या तयार करणारा कारखाना हा सर्वसाधारणपणें आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण कारखाना म्हणतां येईल. त्यासाठीं सुमारें १ लाख रुपये वसूल केलेलें भांडवल व ३० ते ४० कामगार लागतील.

या धंद्यास लागणाऱ्या कच्च्या मालापैकीं गॅलिक व टॅनिक ॲसिड आणि रंग याशिवाय बाकीची सामग्री देशांत मिळते. कच्च्या मालावर एकूण उत्पादन खर्चापैकीं ८ ते १० टक्के खर्च होतो. देशी शाई परदेशांतून आयात केलेल्या शाईपेक्षां चांगली असते, देशी शाईविरुद्ध पूर्वग्रह दृढमूल आहे, हा धंदा जगविण्यासाठीं पुढील २-३ वर्षें परकीय आयातीस संपूर्ण बंदी केली पाहिजे, या धंद्यास लागणाऱ्या कच्च्या मालावरील आयात जकात कमी करण्यांत यावी आणि परकीय धंदेवाल्यांना हा धंदा करण्यास परवानगी देण्यांत येऊं नये, अशी शाईच्या कारखानदारांची मागणी आहे. टॅरिफ बोर्ड ह्या मागणीची चौकशी करीत आहे.

### कोऑपरेटिव्ह बँकांना गुमास्ता कायद्याची सवलत

शेतकऱ्यांना धंद्याचें शिक्षण देणें, देखरेख व प्रचार इत्यादि कामांत गुंतलेल्या कोऑपरेटिव्ह बँकेच्या नोकरांना मुंबई सरकारनें १९४८ च्या गुमास्ता कायद्याच्या विभाग १३ मधून सूट दिली आहे. या विभागांत बँक वगैरे सारख्या व्यापारी संस्थांच्या उघडण्याच्या व बंद होण्याच्या वेळा ठरवून दिल्या आहेत.

## कंपनी कायदा व आगामी सुधारणा

### ऑडिटरांवरील जबाबदारी

( लेखकः—श्री. गो. द्. आपटे, बी. ए., जी. डी. ए., एफ. सी. ए., चार्टर्ड अकौन्टंट, पुणे. )

वरील शीर्षकाखालीं श्री. "आशावादी" ह्यांनीं ऑडिटर्स, त्यांची निवडणूक, त्यांचीं सर्टिफिकिटें, इत्यादिविषयीं तपशीलवार सूचना केल्या आहेत. कंपन्यांचा कारभार सुधारावा, ह्या दृष्टीनें त्या सूचना केल्या आहेत आणि ह्या सद्हेतूविषयीं मतभेद होण्याचें कारणच नाहीं.

वर्ष अखेरीबद्दलची "आशावादी" ह्यांनीं सुचविलेली सुधारणा अंमलांत आणण्याजोगी आहे. ऑडिटरांच्या निवडणुकीबद्दलची त्यांची सूचना अंमलांत आणावयाची म्हटलें, तर ती फार खर्चाची, घोटाळ्याची व म्हणून अव्यवहार्य होईल. निवडणूक आणि तिचा निकाल जाहीर होणें ह्यांत फार कालावधि जाईल आणि ऑडिट सतत वर्षभर करावयाचें असेल, तर अशा ऑडिटला प्रारंभ करण्यास विलंब होईल. ऑडिटरला फक्त तीनच वर्षे लागोपाठ एका कंपनीचें काम करतां यावें, त्यानंतर सहा वर्षे त्यानें विश्रांति घेतलीच पाहिजे, ह्या सूचनेमुळें काय साधणार? ऑडिटरांवर जी कायदेशीर जबाबदारी आहे, ती त्यांना कांहीं चुकवितां येत नाहीं. मग हें बंधन कशाला?

कंपनीच्या स्टॉकबद्दल आडिटरांकडून ज्या प्रकारच्या सर्टिफिकेटाची श्री. "आशावादी" अपेक्षा करतात, तें देणें त्यांस शक्य होईल काय? ऑडिटर्सनीं तज्ज्ञांची मदत घ्यावी हें खरें, पण स्टॉकमध्यें समाविष्ट असणाऱ्या हजारों प्रकारच्या जिनसांबद्दल ऑडिटर सर्टिफिकेट देईल, तेंहि दुसऱ्याच्या सल्ल्यावर अवलंबून राहूनच ना? "स्टॉक व स्टॉकच्या किंमती व्यवस्थित, योग्य तऱ्हेनें व वस्तुस्थितीला धरून हिशेबांत आल्या पाहिजेत." पण त्या बाबतींत मॅनेजिंग एजंट व डायरेक्टर ह्यांचाच हिशेब मान्य करणें योग्य ठरेल. सस्पेन्स अकाउंटची तपासणी इतर खात्यांप्रमाणेंच होत असते आणि त्यांत कांहीं दोष आढळले, तर ते दाखविले जातातच. सस्पेन्स अकाउंटचा बेकायदा व्यवहारासाठीं उपयोग करण्यांत आल्याचें नजरेस आल्यावर कोणताहि ऑडिटर त्याबाबत स्तब्ध रहाणार नाहीं. डायरेक्टर्स व मॅनेजिंग एजंटस ह्यांचा खाजगी खर्च कंपनीवर पडतां कामा नये हें खरें; परंतु कोणता खर्च कंपनीवर टाकला असला तरी वस्तुतः तो खाजगी आहे, हें पुष्कळ वेळा ठरविणें ऑडिटरांस शक्य होत नाहीं. प्रवास केला तो कंपनीसाठीच केल्याचा मॅनेजिंग एजंटांना खुलासा करून तपशील दिल्यावर तेथेंच यांचणें भाग आहे. ऑडिटरला अधिक खोलांत तपासणी कशी करतां येईल? डायरेक्टर हे शेअरहोल्डर्सचे प्रतिनिधी व ट्रस्टी असतात आणि त्यांनींच शेअरहोल्डर्सचे हिताकडे दुर्लक्ष करून मॅनेजिंग एजंटांच्या सर्व कृत्यांस मंजुरी दिली, तर ऑडिटर काय करणार? ऑडिटरांनीं जबाबदारी ओळखूनच आपलें कर्तव्य बजावलें पाहिजे, हें अगदी योग्य. ते मॅनेजिंग एजंटांच्या दडपणाखालीं काम करतात असें म्हणतां येणार नाहीं. त्यांची कायदेशीर जबाबदारी जोपर्यंत टळत नाहीं, तोपर्यंत दुसऱ्याच्या दडपणाचा आधार त्यांस काय उपयोगी पडणार? कंपनी कायद्यांत सुचविलेल्या नवीन दुरुस्त्यामध्यें, मॅनेजिंग एजंट व डायरेक्टर यांनीं ऑडिटरचे निवडणुकींमध्यें मत देऊं नये, या दुरुस्तीनें त्यांच्या दडपणाच्या भीतीचें कारण रहाणार नाहीं.

श्री. "आशावादी" ह्यांनीं हिशेबाच्या पत्रकांत जे तपशील यावे अशी मागणी केली आहे, तिचा उद्देश प्रत्यक्ष व्यवहारांत साध्य होणार नाहीं, अशी भीति वाटते. ऑडिटरांवरच सर्व जबाबदारी टाकणें श्रेयस्कर होणार नाहीं. व्यवस्थापक कर्तव्यदक्ष आणि विश्वासार्ह नसतील, तर त्यांचेवर कितीही नजर ठेवली आणि नियंत्रणें लादलीं तरी त्यांचा उपयोग होणार नाहीं. मॅनेजिंग एजंटांवर विश्वास तरी ठेवला पाहिजे, नाहींतर ते बदलले तरी पाहिजेत. गैरविश्वासू मॅनेजिंग एजंटांकडून कायद्याच्या चौकटींत काम करवून घेणें अवघड, नव्हे अशक्य आहे. कंपनीचा कारभार काटकसरीनें व सचोटीनें चालू आहे किंवा नाहीं हें पहाण्याची प्राथमिक जबाबदारी डायरेक्टरांची आहे. कायद्याचीं बंधनें केवळ वाढविल्यानें सुधारणा होणार नाहीं. त्यांतून निसटण्याचाच प्रयत्न सुरू होईल.

### भारतांतील विमान वहातुक

१९४९ मध्यें भारतांतील विमान कंपन्यांनीं एकूण ९३,००० तास उड्डाण करून १ कोटी, ४९ लक्ष मैलांचा प्रवास केला. एकूण ३,५८,००० उतारूंची वहातुक केली आणि १,३३,००,००० पौंड मालाची नेआण केली. १९४८ च्या आकड्यांशीं तुलना केली तर उतारूंचीं वहातुक फक्त ४·९% वाढली आणि माल वहातुक ६२% जास्त झाली. तुलनात्मक आकडे खालीं दिले आहेत:—

| वर्ष | उड्डाणाचे तास | मैल प्रवास | उतारू | माल (पौंड) |
|---|---|---|---|---|
| १९४५ | २९,७,८१ | ३३,२०२७७ | २४,०९० | ८,५२,०६८ |
| १९४६ | २९,५३९ | ४५२००४६ | १,०५,२५१ | १३,१८,१५३ |
| १९४७ | ५९,३०१ | ९३,६१६७३ | २,५४,९६० | ३८,६८,५४६ |
| १९४८ | ७८,९६१ | १,२६,४८,७६५ | ३,४१,१८६ | ८१,५६४७१ |
| १९४९ | ९३,००० | १,४९,००,००० | ३,५८,००० | १,३३,००,००० |

एकूण १२ कंपन्या वक्तशीर वैमानिक वहातुक करीत होत्या. त्यापैकीं २ कंपन्या बंद पडल्या. बाकीच्या १० कंपन्या ३७ मार्गांवर वहातुक करीत होत्या. एअर इंडिया इंटरनॅशनल लि., मुंबई—कैरो—जिनीव्हा—लंडन वहातुक करीत होती. तिला १९,७९,२५४ रु. तोटा आला. चालू वर्षी तिनें काटकसरीची विशेष योजना केली आहे.

### मालक परगांवीं असला, तरी फॅक्टरी ॲक्टांतून तो सुटत नाहीं

भारत टूल मॅन्युफॅक्चरिंग कंपनी, परेळ, ह्या कारखान्यास सरकारी फॅक्टरी इन्स्पेक्टरानें अचानक भेट दिली, तेव्हां कामगारांपैकीं पांच कामगार त्यांच्या ठराविक कामाच्या वेळेबाहेर काम करीत असल्याचें आढळून आलें. म्हणून, फॅक्टरी ॲक्टाच्या ६३ व्या कलमानुसार कंपनीचे मालक श्री. सासळचंद जी. शहा व मॅनेजर ह्या उभयतांवर खटला भरण्यांत आला. मॅनेजरनें गुन्हा कबूल केल्यावरून त्यास मॅजिस्ट्रेटनें दोषी ठरवून शिक्षा केली, परंतु श्री. शहा मुंबईमध्यें नव्हते म्हणून त्यास निर्दोषी म्हणून सोडून दिलें. ह्या निकालावर मुंबई सरकारनें हायकोर्टांत अपील केलें. श्री. शहा मुंबईला नव्हते तरी सुद्धां ते सुटूं शकत नाहींत, हें सरकारी वकिलाचें म्हणणें हायकोर्टानें मान्य करून श्री. शहा ह्यांस २५० रु. दंड केला.

### जर्मन व जपानी स्पर्धेची भीति

" जर्मन व जपानी व्यापारी स्पर्धा वाढत आहे. इतर कोणाहिपेक्षा ४२% कमी दरानें जर्मन कारखानदारांनीं टर्कीमध्यें एक कंत्राट मिळविलें आहे. पाकिस्तानांत, ब्रिटिश यंत्रसामुग्रीपेक्षा ३० ते ४०% स्वस्त जपानी यंत्रसामुग्री विकली जात आहे."

मि. ऑलिव्हर लिटलटन ह्यांचें ब्रि. कॉमन्ससभेंत भाषण.

## धूतपापेश्वर इन्डस्ट्रीज लिमिटेड, पनवेल (मुंबई)

### गुरुवार, ता. २०-४-१९५० रोजीं पहिल्या ऑर्डिनरी जनरल मीटिंगच्या वेळचें

### श्री. दादासाहेब गोठे यांचें अध्यक्षीय भाषण

... पहिल्याच वर्षी डिव्हिडंड देतां येणें फारच थोड्या कंपन्यांच्या भाग्यांत येत असतें. एक चालू कारखाना कंपनीस विकत घेतां आल्यामुळेंच आपल्या कंपनीस हें शक्य झालें आहे.

#### स्थापनेची पूर्व-पीठिका

धूतपापेश्वर इंडस्ट्रीज लि. ह्या पब्लिक लिमिटेड कंपनीच्या स्थापनेची पूर्वपीठिका अशी आहे कीं, सन १९४६-४७ मध्यें त्या वेळच्या सरकारनें पुरस्कृत केलेलें ऑल इंडिया मॅन्युफॅक्चरर्स ऑर्गनायझेशनचें एक शिष्टमंडळ युरोप व अमेरिकेंतील कारखाने पहाण्यास गेलें होतें. या शिष्टमंडळांत श्री. नानासाहेब पुराणिक यांचा समावेश झाला होता. ह्या शिष्टमंडळाचे एक सभासद म्हणून श्री. नानासाहेब तिकडील कारखाने व परिस्थिति पाहून आले. त्यावेळीं दुसरें जागतिक युद्ध नुकतेंच संपलें होतें. युद्धाचा परिणाम, बाहेर देशांतून येणाऱ्या मालावरचे निरनिराळे निर्बंध, वगैरेमुळें तिकडील उद्योगपति "मालाच्या खपाच्या प्रदेशांत तो माल तयार करण्याचे कारखाने उघडावे" या दिशेनें विचार करीत होते. औषधें तयार करणाऱ्या तिकडील कांहीं कंपन्या इकडील धंद्यास तिकडून भांडवल, शास्त्रीय सल्ला, मशनरी, तज्ज्ञ व पेटन्टस यांची मदत देण्यास उत्सुक होत्या. याप्रमाणें श्री. नानासाहेब यांचे कांहीं कारखानदार मंडळींबरोबर बोलणेंहि झालें होतें. अशा प्रकारच्या परिस्थितीचा फायदा घेणें शक्य व्हावें म्हणून ह्या कंपनीची कल्पना निघाली व कंपनीचें मेमोरँडम व आर्टिकल्स ऑफ असोसिएशन तयार होऊन पुढें सन १९४८ मध्यें कंपनीची स्थापना झाली. श्री पुराणिकबंधूंनीं या नवीन कंपनीचें नांव "धूतपापेश्वर इंडस्ट्रीज" असें असावें असें सुचविलें व अर्थातच ती सूचना सर्वांस मान्य झाल्यामुळें ह्या नवीन कंपनीचें नांव 'धूतपापेश्वर इंडस्ट्रीज" असें असावें असें ठरलें.

आरोग्यमंत्रि श्री. अमृत कौर यांनीं म्हटल्याप्रमाणें आपल्याकडे औषधिसंपत्ति खरोखर विपुल आहे. या धंद्यास पुष्कळ मोठा वाव आहे. परदेशांतून सर्व प्रकारचीं मिळून सुमारें पंधरा-सोळा कोटी रुपयांचीं औषधें हल्लीं दरवर्षी येत असावीं असा एक अंदाज आहे. भारतीय औषधांचा प्रसार वाढेल त्या प्रमाणांत परदेशांत तयार झालेल्या औषधांची आयात कमी करावी लागून देशाच्या संपत्तीची तेवढी बचत होईल. शिवाय औषधांसारख्या आवश्यक वस्तूंच्या बाबतींत परदेशांवर अवलंबून रहाणें केव्हांहीं इष्ट नाहीं आणि युद्धकाळांतील अडचणी तर आपण अनुभविल्याच आहेत.

भारतांतील ८५ टक्के लोक आयुर्वेदीय चिकित्सा पद्धतीचा उपयोग करतात, अर्थात् आयुर्वेदीय औषधें वापरतात. त्यामुळें नवीन कांहीं उपक्रम सुरू करण्यापूर्वी आपल्या कंपनीच्या डायरेक्टर्स यांच्या मनांत श्रीधूतपापेश्वर पनवेल लि. चा कारखाना आपल्या कंपनीकरतां घ्यावा असें येऊन प्रयत्न सुरू झाले व श्री. नानासाहेब व श्री. काकासाहेब पुराणिक आपले डायरेक्टर असल्यामुळें त्यांचें मन वळवून आपल्या कंपनीनें तो नामवंत कारखाना खरेदी करावा असें ठरलें. त्याप्रमाणें विक्रीचा करारनामा झाला व ता. ३० मार्च १९४९ रोजीं गुढी पाडव्याचे सुमुहूर्तावर आपल्या कंपनीच्या ताब्यांत पनवेलचा सुप्रसिद्ध कारखाना आला.

#### पुराणिक बंधूंचा उदात्त हेतु

धूतपापेश्वर कारखान्याच्या आज पाऊणशें वर्षांवर चालू असलेल्या धंद्यांचें गुडविल व त्यांच्या ट्रेडमार्क, पेटंट्स वगैरेंचें मूल्य लाखांवारी झालें असतें, पण कारखान्याचे मालकांनीं अगदीं नाममात्र ( Nominal ) अशा रु. २५००० (पंचवीस हजार ) या रकमेस हें सर्व देण्याचें मान्य केलें. अशा कोणताहि नामवंत धंदा एवढ्या नाममात्र गुडविलच्या रकमेस मिळणें अशक्य आहे. कमीत कमी काळांत जास्तींत जास्त मोठें स्वरूप कारखान्यास यावें म्हणून व आयुर्वेदीय औषधांचा उत्कर्ष व्हावा, विश्वसनीय अशा औषधांचा वाढता पुरवठा व्हावा, या उदात्त हेतूनें श्री. नानासाहेब व श्री. काकासाहेब पुराणिक यांनीं हा कारखाना येवढ्या अल्प किंमतीस आपल्या या कंपनीस दिला.

भांडवलाबाबतच्या सरकारी नियंत्रणांमुळें त्यावेळीं परवानगी मिळविल्याशिवाय पांच लाखांपेक्षां अधिक भांडवल उभारणें शक्य नव्हतें. म्हणून, कंपनीची सुरवात डायरेक्टर्स व त्यांचे मित्र व हितचिंतक यांनीं उभारलेल्या पहिल्या रुपये पांच लाखांच्या विक्रीस काढितां येत असलेल्या भांडवलांतून केली. या पांच लाखांपैकीं रु. ३,३०,००० तीन लाख तीस हजारांचे शेअर्स श्री धूतपापेश्वर पनवेल लि. यांचे नॉमिनीज् (Nominees) यांस कारखान्याच्या किंमती पोटीं दिले आहेत.

जरूर असलेलें भांडवल विक्रीस काढण्याची परवानगी कंट्रोलर ऑफ कॅपिटल इश्यूज् न्यू दिल्ली, यांचेकडून मागविली होती. त्याप्रमाणें पंधरा लाख रुपये भांडवल उभारण्याची परवानगी नुकतीच आली आहे. त्यापैकीं पांच लाखांचें भांडवल डायरेक्टर्स आतां विक्रीस काढीत असून कंपनी ॲक्टप्रमाणें हें भांडवल प्रथम जुन्या शेअर होल्डर्सना देऊं करणार आहेत.

#### पहिल्याच वर्षी ५% टॅक्स फ्री डिव्हिडंड

आपल्या डायरेक्टर्सना श्रीधूतपापेश्वर पनवेल लि. यांचा पनवेलचा कारखाना विकत घेण्यांत यश मिळाल्यानें व तो कारखाना चालवीत असलेल्या कंपनीसच मॅनेजिंग एजंटस नेमून त्यांच्या तज्ज्ञ लोकांची कारखाना चालविण्यास संपूर्ण मदत मिळाल्यानें केवळ नऊ महिन्याचे मुदतींत आपणास सादर केलेल्या रिपोर्टाप्रमाणें कंपनीस रु. ६४,५६५-१४-० नफा झाला आहे. पहिल्याच वर्षी कंपनीनें ५% टॅक्सफ्री डिव्हिडंड दिलें आहे. या नऊ महिन्यांपैकी सुरवातीचे तीन महिने मुंबई सरकारच्या दारुबंदीसंबंधीं कायद्यामुळें आसवें व आरिष्टें यांची विक्री बंदच होती. दारूबंदीच्या योजनांमध्यें आसवारिष्टांवर अनावश्यक नियंत्रणें आलीं होतीं. आयुर्वेदीय चिकित्सा व्यवहारांवर व कारखान्यांवर हें मोठेंच संकट आलें होतें. अशा वेळीं, आसवारिष्टांचे बाबतींत मुंबई सरकारनें घातलेले निर्बंध शिथिल करण्यांत आपल्यापैकी श्री. नानासाहेब पुराणिक यांचा विशेष भाग आहे, ही मोठ्या अभिमानानें व आनंदानें मी आपल्या नजरेस आणूं इच्छितों. अर्थात् सरकारनें आमच्या म्हणण्याचा सहानुभूतिपूर्वक विचार केल्यामुळेंच हें होऊं शकलें. कंपनीच्या डायरेक्टर्सचा विचार सांप्रत आयुर्वेदीय औषधांचे निर्मितीवर जास्त भर देऊन त्यांत शास्त्रीय रीत्या शक्य तेवढी सुधारणा करण्याचा आहे.

आपल्या कंपनीनें औषधी संशोधनासाठी स्वतंत्र विभाग चालविला असून त्याचे प्रमुख म्हणून वै. पु. वि. धामणकरशास्त्री

आयुर्वेदभूषण यांची नेमणूक केली आहे. त्यांत प्रमाणित ( Standardised ) औषधिनिर्मितीसाठी आवश्यक अशा आयुर्वेदीय औषधि पाठ चिंतामणी ( Pharmacopia ) चें कार्य चालू आहे. प्रयोगानें ग्राह्य ठरणाऱ्या सुधारणा औषधि निर्मितीमध्येंहि चालूं आहेतच.

निखिल भारतीय वैद्य संमेलनाचे अध्यक्ष मुंबईचे सुप्रसिद्ध वैद्य यादवजी त्रिकमजी आचार्य, आयुर्वेदमार्तंड यांचा आपल्या डायरेक्टर बोर्डामध्यें अंतर्भाव झालेला आहे. ही गोष्ट विशेष आनंदाची आहे. वै. यादवजी भाईना कारखान्याबद्दल पूर्वीपासूनच आपलेपणा होता. आतां तर डायरेक्टर या नात्यानें कारखान्याशीं त्यांचा घनिष्ट संबंध येत आहे. डायरेक्टर झाल्यावर त्यांनीं कारखान्यास आपुलकीनें भेटही दिली.

### मशीन्सचा उपयोग

कंपनीनें कारखाना विकत घेतल्यावर कांहीं नवीन मशीन्स बसविलीं आहेत. अशींच आणखीं कांहीं मशीन्स आणवून खर्चात बचत करण्याचा डायरेक्टर्स यांचा विचार आहे. परदेशांतून मशीन्स आणविण्याकरितां भारत सरकारकडून परवानगी मिळविण्याचे प्रयत्न चालू आहेत. "धूतपापेश्वर" किंवा "पनवेल" चीं औषधें किती प्रख्यात आहेत हें आपण जाणतांच व या औषधांची मागणी सारखी वाढत आहे. ही वाढती मागणी पुरविण्यास मदत म्हणून मशीन्सचा उपयोग होत आहे आणि व्हावयाचा आहे. मशिनरी निवडतांना ती आयुर्वेदीय औषधी निर्मितीस सुयोग्य अशीच निवडण्यांत येते. धंद्यामध्यें अनेक अडचणी व्यवसायामध्यें येतात. तरीही संकल्पित योजना यशस्वी होत असून चालू वर्षाच्या पहिल्या तीन महिन्यांतील व्यवहार वाढ पाहतां चालू वर्षी वृत्तांतकालापेक्षां २५ टक्के तरी व्यवहारांत वाढ व्हावी अशी बळकट आशा आहे.

---

**भारतांतील साखरेचे कारखाने**—टॅरिफ बोर्डानें साखरेच्या धंद्याबद्दल जो अहवाल नुकताच तयार केला आहे त्यांत असा निष्कर्ष काढण्यांत आला आहे कीं साखरेचा धंदा भरभराटला असला तरी कापड, कागद, लोखंड आणि कोळसा ह्या धंद्यांच्या मानानें, साखरेच्या धंद्यांतील नफा कमी आहे. तथापि साखरेच्या कारखान्यांतील भागीदारांना समाधानकारक नफा मिळालेला आहे आणि धंद्यांत भांडवल गुंतविणें आकर्षक ठरलें आहे. अहवालांत निरीक्षण करण्यांत आलेल्या २६ कंपन्यांपैकी १९ कंपन्यांनीं आपल्या वसूल भांडवलांत खूपच भर घातली आहे. १९३३–३४ ते १९४७–४८ ह्या कालांत संयुक्त-प्रांतांतील साखरेच्या कारखान्यांना दरवर्षी सरासरी २५·६५ टक्के नफा झाला; बिहारमधील कारखान्यांना ह्याच कालांत वार्षिक सरासरी नफा १३·५६ झाला. इतर प्रांतांतील नफ्याची टक्केवारी पुढीलप्रमाणें आहे. मुंबई प्रांत, ४३·७० टक्के, मद्रास-प्रांत, ३५·१३ टक्के, इतर प्रांत २७·६९ टक्के.

**भारतांतील लोकसंख्या**—मुंबई सरकारचे एक अधिकारी श्री. राघवराव ह्यांचें भारताच्या लोकसंख्येविषयीं एक व्याख्यान झालें. भारतांतील जनतेचें दरहजारी पडणारें मृत्यूचें प्रमाण सर्व जगांत अधिक आहे, आयुर्मर्यादाही अल्प आहे आणि लोकसंख्येचा दर्जाही समाधानकारक नाहीं, असें त्यांनीं सांगितलें. २३ व्या किंवा २४ व्या वर्षी विवाह करण्यास उत्तेजन देण्यांत यावें असें मत त्यांनीं प्रतिपादन केलें.

## ब्रिटनचें अंदाजपत्रक : सर स्टॅफोर्ड क्रिप्स यांच्या भाषणांतील कांहीं मुद्दे

( मा. म. काळे. )

ब्रिटनचें नवीन वर्षाचें अंदाजपत्रक सादर करतांना सर स्टॅफोर्ड क्रिप्स यांनीं असा खुलासा केला कीं, स्टर्लिंगच्या पतीला बाध येणार नाहीं अशा तऱ्हेचें धोरण युरोपनें ठरवायाच्या देण्याच्या बाबतींत स्वीकारलें जाईल. चलनविस्तारापासून अजूनहि ब्रिटनला सावधगिरी बाळगावी लागत आहे. यंदांच्या अंदाजपत्रकांत प्राप्तीवरील करांत खालच्या व मध्यम पातळींतील कर भरणारांना थोडी सवलत दिली जाईल व पेट्रोलवरील कर वाढविला जाईल. गेल्या तीन वर्षांत ब्रिटनच्या अर्थव्यवस्थेला लागलेल्या वळणाचा भरपूर दृश्य परिणाम उत्पादनाच्या परिस्थितीवर झालेला दिसून येत आहे व कांहीं आर्थिक नियंत्रणें चालूं ठेवलीं तरी यापुढें विशेष भर परस्परांमध्यें विचार विनिमय, वागण्याबद्दलचे कांहीं संकेत, व इतर लोकशाहीला अनुरूप असे मार्ग यांवर ठेवावा लागेल. पौंडाच्या अवमूल्यनानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीला ब्रिटन अपेक्षेपेक्षां यशस्वी रीतीनें तोंड देऊं शकलें, याचें कारण म्हणजे ब्रिटनच्या आर्थिक परिस्थितीचा मूलभूत मजबूतपणा व अनेक देशांशीं निर्गत व्यापार करून स्टर्लिंगची परिस्थिति शक्य तितकी चांगली राखण्याचें धोरण होय. बाकीच्या जगाशीं ब्रिटनला व्यापारांत अनुकूल तफावत उरूं लागली आहे व त्यामुळें सोनें व डॉलर्स यांची ठेव पुन्हा थोडी सुधारूं लागेल हें जरी खरें असलें, तरी जर्मनी व जपान या दोन देशांची स्पर्धा आंतरराष्ट्रीय व्यापारांत पुन्हा जाणवूं लागेल हें विसरून चालणार नाहीं. आयात मालाच्या बाबतींत अवमूल्यनामुळें ब्रिटनची परिस्थिति कमी: अनुकूल झाली आहे. गेल्या तिमाहींत अमेरिकेनें स्टर्लिंग गटांतील देशांपासून जास्त प्रमाणांत प्राथमिक स्वरूपाचा माल खरेदी केल्यामुळें सोनें व डॉलर्स यांच्या शिलकीबद्दलची परिस्थिति सुधारलेली दिसते, परंतु अमेरिका या प्रमाणांत नेहमींच खरेदी करील असें नाहीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे. पश्चिम युरोपची संस्कृति टिकवून धरावयाची असेल तर डॉलर तुटीचा प्रश्न कायमचा सोडविला पाहिजे. ब्रिटननें परराष्ट्रीय देण्याच्या बाबतींत व शिलकीच्या बाबतींत आणि अंतर्गत उत्पादनावर बेकारी कधींहि होऊं नये या दृष्टीनें योग्य तीं नियंत्रणें ठेवलीं तर आंतरराष्ट्रीय व्यापारांत राष्ट्राराष्ट्रामध्यें कोणत्याहि तऱ्हेचे निर्बंध राहूं नयेत व खुला व्यापार रूढ व्हावा हें धोरण ब्रिटनच्या व्यापाराच्या दृष्टीनें फायद्याचेंच ठरेल.

अजूनहि चलन वाढीपासून सावधगिरीचें धोरण ब्रिटनला ठेवावें लागत आहे. गेल्या वर्षी औद्योगिक उत्पादन वस्तूंच्या रूपांत ६॥ टक्क्यानीं वाढलें. गेल्या वर्षी नवीन भांडवली खर्च २४७ कोटी पौंड झाला, व १९५० सालीं नवीन भांडवल-गुंतवणीपैकीं दोन-तृतियांश खर्च उत्पादनासाठी व एक-तृतियांश सामाजिक हिताच्या गोष्टींसाठी होईल. गेल्या वर्षी १७·३ कोटी पौंड कर्जाची फेड करण्यांत आली, नवीन राष्ट्रीय कर्ज ८०·९ कोटी पौंड उभारण्यांत आलें व यामुळें एकंदर राष्ट्रीय कर्जांत प्रत्यक्ष भर ६३·६ कोटी पौंड इतकी पडली.

---

## सातारा स्वदेशी क. कं. लि. (बँक) तर्फे चिरमुले सत्कार

### श्री. अण्णासाहेब चिरमुले ह्यांचें भाषण

"आपण माझ्या कार्याची जी प्रशंसा केली तें कार्य एकट्याचें नसून माझ्या बरोबर माझ्या इतर सहकार्यांचे आहे असें मी मोठ्या कृतज्ञतेनें नमूद करूं इच्छितो. संस्थांची कार्यें एकट्या दुकट्याची नसतात. कार्य करणारांपैकीं कोणास तरी पुढें केलें जातें व जो पुढें केला जातो त्याचा मात्र सामुदायिक कार्यांतील यशाबद्दल गौरव केला जातो.

### सहकार्याबद्दल कृतज्ञता

"या प्रसंगीं कंपनीच्या संस्थापकांपैकीं माझे दिवंगत स्नेही कै. नानासाहेब आगाशे, कै. दादासाहेब करंदीकर, कै. वामनराव गोवईकर व सुदैवानें हयात असलेले स्नेही श्री. अण्णासाहेब आपटे, नामदार भाऊसाहेब सोमण, श्री. श्रोत्री व श्री. दांडेकर या सर्वांची त्यांनीं कंपनीचे उत्कर्षासाठीं सोसलेले कष्ट व दाखविलेली आस्था पाहून आठवण होते व हृदय भरून येतें. त्याचप्रमाणें पुढें कंपनीच्या बोर्डावर वेळोवेळीं आलेल्या इतर मंडळींनीं मला दिलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. श्री. शंकरराव साठे यांनीं तर गेलीं ३२ वर्षें मोठ्या आस्थेनें मला सहाय्य केलें आहे. व आतां तर वेळ नसताना सुद्धां इतर कार्यें बाजूस ठेऊन अध्यक्षपदाचें दगदगीचें काम यशस्वी रीतीनें चालविलें आहे. या सर्व सहकाऱ्यांच्या मदतीशिवाय मी एकटाच कंपनीचें कार्य सुव्यवस्थित रीतीनें चालवूं शकलों नसतों. म्हणूनच माझा जो गौरव झाला तो माझा एकट्याचा नसून सर्वांचा आहे, असें समजून मी त्याचा साभार स्वीकार करतो.

### कंपनीच्या स्थापनेची पार्श्वभूमि

"या कंपनीची स्थापना उज्वल अशा राष्ट्रीय भावनेंत झाली. सन १९०६-७ च्या राष्ट्रीय आंदोलनांत कित्येक तरुणांनीं आपलें सर्वस्व पणास लावून त्यांत भाग घेतला. कित्येक राष्ट्रभक्त फाशीं गेले, तर कित्येक तुरुंगांत गेले. त्या सर्वांच्या स्वार्थत्यागाचे मानानें साताऱ्यांतील त्या वेळच्या तरुण मंडळींनीं स्वदेशी मालाच्या प्रसाराबद्दल ही कंपनी स्थापून जो अल्पस्वल्प उद्योग केला तो कांहींच नव्हे. माझें परमभाग्य असें मी हेंच समजतों, कीं मला त्या आपल्या राष्ट्रीय आंदोलनाचें स्वराज्याचें ध्येय साध्य झालेलें पहावयास मिळालें. स्वदेशी माल इतरत्र व सर्वत्र मिळूं लागतांच कंपनीनें तिची व्यापारी कामें बंद करून सराफीचा धंदा वाढविला. साताऱ्यांत स्थापन झालेली ही पहिलीच कंपनी होय व माझी एवढीच इच्छा आहे कीं, या पुढें सुद्धां तिनें साताऱ्यांत बँकिंग क्षेत्रांतील आपलें स्थान पहिलें ठेवावें.

### चिरमुले कार्यपद्धति

"माझ्या कार्यपद्धतीबद्दल आपण बरेंच ऐकलें आहे. माझी विशिष्ट अशी कार्यपद्धति नाहीं. बँकेच्या हितास कोणत्याहि प्रकारचा कमीपणा न आणतां कंपनीच्या गिऱ्हाइकांच्या गरजा जास्तींत जास्त कशा पुरविता येतील इतकेंच मी पहात आलो आहे. साधारणपणें सर्वच बँकांतून ही पद्धत असते. विविक्षित तारणापेक्षां गिऱ्हाईकांची दानत व व्यवहारांतील सचोटी या गुणांना मी जास्त महत्त्व देतो व बँकांच्या कर्जास गिऱ्हाईकांची दानत हेंच मूळ तारण होय असें मी मानतो.

"गिऱ्हाइकांच्या पतीची अचूक परीक्षा करता येणें यावरच बँकेचें यशापयश अवलंबून असतें व ही कला अनुभवावरून येते. ज्यांचा बँकेशीं दीर्घकाळ संबंध येऊं शकतो, अशानांच गिऱ्हाइकांच्या व्यवहाराबद्दल योग्य तें निदान करता येणें शक्य होतें. म्हणूनच बँकेच्या बोर्डावरील मंडळींत वरचेवर बदल होत नाहींत.

### थैलीचा ट्रस्ट

"आपण दिलेल्या थैलीचा मी आताच दिलेल्या कारणास्तव खाजगीकडे उपयोग करणार नाहीं, हें निराळें सांगावयास नकोच. या रकमेचा उपयोग बँकेच्या हिताकडे कसा करता येईल याबद्दल मी विचार करीत आहे. रकमेचा ट्रस्ट करून तो वेस्टर्न इंडिया ट्रस्टी आणि एक्झिक्यूटर कंपनीकडे चालवावयास देण्याचा माझा विचार असून त्याप्रमाणें मी आज ही रक्कम सदर कंपनीचे हवालीं देत आहे."

## स्त्रियांच्या औद्योगिक सहकारी संस्था

### कार्यकर्त्यांना शिक्षण देण्यासाठी सरकारी मदत

स्त्रियांच्या औद्योगिक सहकारी संस्थांचें वाढतें महत्त्व लक्षांत घेऊन आणि अशा संस्थांतील कार्यकर्त्यांना शिक्षण देण्याच्या आवश्यकतेचा विचार करून मुंबई सरकारनें अशा संस्थांना त्यांच्या कार्यकर्त्यांच्या शिक्षणासाठी येणारा खर्च भागविण्यासाठी आर्थिक मदत देण्याचें ठरविलें आहे. ज्या सहकारी संस्थांना व्यवस्थेच्या खर्चासाठी आधींच आर्थिक मदत मिळत असेल त्यांना शिक्षणाच्या कार्यासाठी जास्तींत जास्त २५० रुपये किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या निम्म्या खर्चाइतकी यापैकीं जी कमी असेल तेवढी रक्कम मिळेल. ज्यांना कसलीच आर्थिक मदत मिळत नाहीं त्यांना कार्यकर्त्यांच्या शिक्षणासाठी सबंध खर्चाइतकी अर्थात जास्तींत जास्त ४५० रुपये आर्थिक मदत देण्यांत येईल. शिक्षण घेणाऱ्या उमेदवारांनीं त्यांचें शिक्षण पूर्ण झाल्यानंतर निदान दोन वर्षें तरी संबंधित संस्थेंत काम केलें पाहिजे या अटीवरच आर्थिक मदत देण्यांत येईल.

### दि पूना इन्व्हेस्टर्स लि.

मध्यवर्ती सरकारचा बँकिंग कंपन्यांचा कायदा वरील कंपनीस लागू झाला, त्याचा कंपनीनें फायदा घेऊन आपला व्यवहार वाढविला आहे १९४९ अखेरचा कंपनीचा ताळेबंद १०,२५,३९३ रुपयांचा आहे. कंपनीस ५,१६४ रु. नफा झाला असून भागीदारांना ७% करमाफ डिव्हिडंड वाटण्यांत आलें आहे. माननीय का. बा. साळवेकर ह्यांच्या कर्तबगारीमुळें आणि चिकाटीमुळेंच कंपनीचा प्रारंभापासून उत्कर्ष होत आला आहे. त्यांच्या पूर्वीच्या कराराचे ऐवजीं बँकिंग कायद्याप्रमाणें त्यांची आतां मॅ. डायरेक्टर म्हणून योजना झाली आहे. बोर्डाच्या चेअरमननीं रावबहादुर शेंबेकर व मा. वर्तक ह्यांच्या विशेष सहाय्याचा प्रामुख्यानें उल्लेख केला आहे. ( चेअरमनः श्री. गं. शि. आढकर, वकील. मॅनेजिंग डायरेक्टरः श्री. का. बा. साळवेकर. )

### गर्जना वर्षारंभ विशेषांक

गर्जना साप्ताहिकाचा आठव्या वर्षाचा पहिला अंक विशेषांक म्हणून प्रसिद्ध करण्यांत आला आहे. अत्यंत थोड्या अवधींत त्याची तयारी पुरी करावी लागली, तरी सुद्धा त्यांना उत्कृष्ट लेखकांचें व जाहिरातदारांचें सहाय्य लाभलें, ह्यावरून गर्जनाकार श्री. गणपतराव पाध्ये ह्यांच्या तपश्चर्येबद्दल इतरांना वाटणारा आदर स्पष्ट दिसून येतो. श्री. पाध्ये यांच्या ध्येयनिष्ठेस कार्यक्षमतेची जोड असल्यामुळेंच त्यांची "गर्जना" प्रभावी होत आहे.

## भारताची लोकसंख्याः राज्यवार वांटणी

भारताची १ मार्च १९५० रोजींची अंदाजें लोकसंख्या ३४ कोटी, ७३ लक्ष एवढी आहे. लोकसंख्येंत दरसाल ३२ लाखांची भर पडत आहे. भारताची लोकसंख्या खालील प्रमाणें राज्यांत विभागलेली आहे.

| राज्य | लोकसंख्या ( लक्ष ) |
|---|---|
| आसाम | ८५ |
| बिहार | ३९४ |
| मुंबई | ३२७ |
| मध्यप्रदेश | २०९ |
| मद्रास | ५४३ |
| ओरिसा | १४४ |
| पंजाब | १२६ |
| उत्तर प्रदेश | ६१६ |
| प. बंगाल | २४३ |
| हैद्राबाद | १७७ |
| जम्मू-काश्मीर | ४४ |
| मध्यभारत | ७९ |
| म्हैसूर | ८० |
| पतियाळा-पूर्वपंजाब सं. | ३३ |
| राजस्थान | १४७ |
| सौराष्ट्र | ३९ |
| त्रावणकोर-कोचीन | ८६ |
| अजमीर | ७ |
| भोपाळ | ८ |
| बिलासपूर | १ |
| कूर्ग | २ |
| दिल्ली | १५ |
| हिमाचल | १० |
| कच्छ | ५ |
| मणिपूर | ५ |
| त्रिपुरा | ६ |
| विंध्यप्रदेश | ३९ |

## नॅशनल सेव्हिंग्ज सर्टीफिकेटांची विक्री

मुंबई राज्यांत नॅशनल सेव्हिंग्ज सर्टीफिकेटांची विक्री करण्यासाठी अधिकृत एजन्ट नेमण्याची पद्धत सुरवातीस प्रयोग म्हणून १५ महिने चालू ठेवण्यांत येईल. अधिकृत एजन्टांना फक्त १२ वर्षें मुदतीच्या सेव्हिंग्ज सर्टीफिकेटांवरच कमिशन मिळेल आणि कमिशनचा दर ५ रुपयांच्या सर्टीफिकेटावर अडीच टक्के व इतर किंमतीच्या सर्टीफिकेटावर सव्वा टक्का असा राहील. अधिकृत एजन्टांस दोन जामीनासह इन्डेम्निटी बाँड लिहून यावा लागेल. त्याचप्रमाणें मुंबई शहरांत दर सहामाहीस १०,००० रु. चें, अहमदाबाद शहरांत दर सहामाहीस ८,००० रुपयांचें, पुणें, सोलापूर, हुबळी, सुरत आणि बडोदें या शहरांत दर सहामाहीस ५,००० रुपयांचें आणि इतर जिल्ह्यांत दरसाल ५,००० रुपयांचें काम केलें जाईल अशी हमीहि यावी लागेल.

**डॉ. ट्रोन इस्राइल सरकारचे सल्लागार**—भारतांतील औद्योगिक योजनांची पहाणी करून सल्ला देण्यासाठीं येऊन गेलेले अमेरिकन एंजिनिअर डॉ. ट्रोन पॅलेस्टाइनच्या इस्राइल सरकारला तशाच प्रकारच्या सल्ला देणार आहेत असें समजतें.

बेडेकर पापड वापरा.

दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड
हेड ऑफिस : पुणें शहर
शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर ( बेलापूर रोड ), ओझर ( जि. नाशिक )
पे-ऑफिसः—खोपोली ( जि. कुलाबा )
श्री. बी. बी. वाळवेकर ( अध्यक्ष ) | श्री. के. पी. जोशी ( उपाध्यक्ष )
अधिकृत भांडवल रु. १५,४३,८१०
विक्री झालेलें भांडवल रु. ७,९३,८१०
वसूल भांडवल रु. ३,९८,२८५
एकूण खेळतें भांडवल ५३ लाखांचे वर
सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.

Dr WAMAN GOPAL'S SARSAPARILLA
BEST BLOOD PURIFIER




हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं ' दुर्गाधिवास ', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.